शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामधील पहिल्या हप्त्यासाठी सहायक अनुदाने (अनिवार्य) वितरीत करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन ज्ञापन क्रमांक-माराग्रं-२०२६/प्र.क्र.१३१/ई-१७८००१९/ग्रं.क.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२६.

**वाचा :-** १) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय यांचे पत्र जा.क्र.३२/२०२६-२७/२३४१, दि.२३.०७.२०२६.

**ज्ञापन :-**

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री अनुदाने यासाठी मान्यता) नियम, १९७० मधील तरतुदीनुसार शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना त्यांनी मागील वर्षी केलेल्या खर्चापैकी मान्य बाबींवर केलेल्या खर्चाच्या ९० टक्के वा त्या ग्रंथालयाच्या दर्जा/वर्गासाठी अनुज्ञेय असलेल्या अनुदानाच्या कमाल मर्यादेइतके यापैकी जे कमी असेल तितके परिरक्षण अनुदान प्रतिवर्षी सामान्यत: दोन हप्त्यात देण्यात येते. याकरिता प्रतिवर्षी ग्रंथालयाने वार्षिक अहवाल व सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले मागील वर्षाचे जमा-खर्चाचे लेखापरिक्षित विवरणपत्र आणि ताळेबंद सादर करणे आवश्यक असते. त्यानुसार, ग्रंथालय संचालनालयाने उक्त वाचा येथील पत्राव्दारे शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना पहिल्या हप्त्याच्या अनुदानासाठी निधी वितरीत करण्याची विनंती केली होती.

२. त्यानुषंगाने, वित्त विभागाच्या सहमतीने शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील पहिल्या हप्त्याच्या परिरक्षण अनुदानासाठी रु.७९,०९,४२,०००/- (अक्षरी रुपये एकोणऐंशी कोटी नऊ लाख बेचाळीस हजार फक्त) इतका निधी वितरीत व खर्च करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. :-

अ) सदर खर्च करण्यासाठी लेखाधिकारी, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, सदर खर्चाकरीता “नियंत्रक अधिकारी” म्हणून संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे असतील.

आ) मागील आर्थिक वर्षामधील थकीत अनुदानाच्या रकमा योग्य / उचित असल्याची तसेच त्याबाबतची कारणमिमांसा अचूक असल्याची खातरजमा संचालक, ग्रंथालय संचालनालय यांनी करावी.

इ) ज्या कारणासाठी निधीची मागणी केली आहे त्याच कारणासाठी निधी खर्च होत असल्याची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी संचालक, ग्रंथालय संचालनालय यांची राहील.

ई) प्रस्तावित निधी वितरीत करताना विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्याची दक्षता संचालक, ग्रंथालय संचालनालय यांची राहील.

उ) सदर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी संचालक, ग्रंथालय संचालनालय यांची राहील.

३. सदर खर्च मागणी क्रमांक "डब्ल्यू-४, २२०५ कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये, (०३) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य, (०३) (०१) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य (अनिवार्य) (२२०५०२९८) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ मध्ये उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.६२७/व्यय-५, दि.०१.१०.२०२६ नुसार मिळालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६१०१३१३११४६९३०८ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DR SHRIKANT
LAXMANRAO
PULKUNDWAR

Digitally signed by DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD,
2.5.4.20=FEB24B5F5D1512BB47F7BAE5AD1DB4953358CD43C999BDF0814C6BB78364D50A, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C10A1E6C8FBE08C1180978BD3ED8A151ED05202D522B09B9960341C2F080906D, cn=DR SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
Date: 2026.10.13 13:12:32 +05'30'

**( डॉ. श्रीकांत पुलकुंडवार )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
६. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. सर्व सहायक ग्रंथालय संचालक / जिल्हा ग्रंथालय अधिकारी (ग्रंथालय संचालनालयामार्फत)
९. कार्यासन, व्यय-५/अर्थ-८, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.अवर सचिव, अर्थसंकल्प, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.निवड नस्ती (ग्रंथालय कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.